अतित्वर्य/महत्वाचे

आरोग्य कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. – एच.ओ./2402
दिनांक -99/८/१६

बैठकीची सूचना

विषय :– वस्ती क्लिनिक चे अंमलबजावणीबाबत.

मा. महापालिका आयुक्त यांचे आदेशानुसार पुणे मनपाचे कार्यक्षेत्रातील झोपडपट्टी परिसरामध्ये वस्ती क्लिनिक सुरू करावयाचे आहेत. सदर मोहिमेचा पहिला टप्पा म्हणून दि.१५ ऑगस्ट २०१६ रोजी पुणे मनपाचे सर्व परिमंडळ कार्यालयांअंतर्गत प्रत्येकी एक वस्ती क्लिनिक सुरू करण्यात येत आहे.

मा.महापालिका आयुक्त यांनी दि.११/८/२०१६ रोजी दिलेल्या तोंडी आदेशानुसार सदर वस्ती क्लिनिक चे नियोजन, अंमलबजावणी व कामकाज व्यवस्थेबाबत दि.१३/८/२०१६ रोजी सकाळी ११:०० वा. कला दालन, घोले रोड येथे बैठक आयोजीत करण्यात आली आहे.

सदर बैठकीस सर्व सह आयुक्त परिमंडळ विभाग, उप आयुक्त मालमत्ता व्यवस्थापन, कार्यकारी अभियंता भवन रचना विभाग, आरोग्य खात्याकडील संबंधीत अधिकारी, सर्व महापालिका सहा. आयुक्त, सर्व परिमंडळ वैद्यकीय अधिकारी, मुख्य समाज विकास अधिकारी व नागरवस्ती विभागाकडील संबंधीत संघटीका यांना उपस्थित राहण्याबाबत मा.महापालिका आयुक्त यांनी निर्देशित केले आहे.

तरी आपण आवश्यक त्या कागदपत्रांसह सदर बैठकीस उपस्थित रहावे ही विनंती.

कळावे.

(डॉ. एस. टी. परदेशी)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका
11/8

प्रत माहितीसाठी सविनय सादर /–

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे मनपा
२) मा. अति. महापालिका आयुक्त (इ)/(ज)/(वि), पुणे मनपा

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी /–

१) सर्व सह आयुक्त परिमंडळ विभाग क्र.१ ते ४.
२) उप आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापन
३) कार्यकारी अभियंता भवन रचना विभाग
४) सर्व महापालिका सहा. आयुक्त
३) मुख्य समाज विकास अधिकारी
४) सर्व परिमंडळ वैद्यकीय अधिकारी